www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

**Annex**
RBIND/R/E/21/02621
Roy

| Sr. No. | Information sought | Our reply |
|---|---|---|
| 1 | Give details of LPT (Language Proficiency Test) question paper of rbi assistant 2019 mumbai region. | The question paper of Language Proficiency test along with marks allocation for recruitment of Assistant 2019 is attached as Annexure 1. |
| 2 | Give topic wise marks allocation in lpt test of rbi assistant 2019 mumbai region. | |

Your Personal Exam Guide

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

## RBI- Marathi LPT - Jan 2021

संध्याकाळी आम्ही लागोलेतला गजाबायच्या गावी गेलो. तिथली घरं समुद्राच्या अगदी कुशीत शिरुन हारीनं निवांत पडलेली होती. तिथे लहानमोठ्या होड्या, वल्ही, मासे पकडायची जाळी नी असंच मच्छिमारीच साहित्य होतं. रत्नागिरीतल्या भाटे राजीवाड्याची आठवण होत होती. त्या घरात एक घर आपल्या वैशिष्ट्यानं सर्वांचे लक्ष वेधून घेत होतं. त्या घराच्या दर्शनी भागाला भलं मोठ्ठ काचेचं तावदान होतं नी त्याच्या आत विविध आकाराच्या शंख शिंपल्याचं भव्य भंडार.....

त्या शंखशिंपल्यात नजर इतकी गुंतली की चालताना ठेच लागून अंगठा मुरगळल्याचंही लक्षात आलं नाही. तेवढ्यात हलू हलू चाला, हलू - हलू या ऽऽऽ अस म्हणत एक बाई पटकन बाहेर आली. उंच, शिडशिडीत, निमगोऱ्या रंगाची, कपाळावर ठसठसीत कुंकू, गळ्यात सोन्याचं मंगळसुत्र, सोन्याच्या बांगडया, कुडया... ती गजाबाय होती. पदराआड गेलेलं गळातलं मंगळसूत्र पदरावर काढत गजाबाय बोलत होती. उत्सुकतेनं आपुलकीनं आमची विचारपूस करत होती. शंखशिंपल्याची ती सागरी श्रीमंती कौतुकानं दाखवत होती.

गजाबायच्या दुकानात काचेच्या मोठ्या कपाटांमधून नुसत्या शंखाचेच नुसत्या शंखाचेच तीनशे प्रकार होते. चक्री शंख, कळी शंख, जांभुळ खावून दात रंगवल्यासारखे फेरे असलेले जांभूळ शंख, लांब पाय पसरलेले कोळी, हळदी, देवळी, गदा, कट्यारी, मुगुटी शंख काही पांढरे शुभ्र पुनव काही झेबऱ्यासारखे पट्टे असलेले तर काही गोकर्णीच्या फुलासारखे वगैरे.

शिवाय शिंपल्यांचेही कित्येक प्रकार... कौल, स्वाती (स्वाती) पायटी, काटेरी, सोनकरंडी असे अगदी नखापासून ते 'ओंजळी' इतके मोठेही होते. त्यातच अधून-मधून ठेवलेली काटेरी कोरल्सची पांढरीशुभ्र फुलं अगदी वेड लावत होती.

कपाटांच्या तळभागात साळींद्रासारखा माशांची तशीच काटेरी भोपळासारखी गोल कातडी नी शार्क माशाच्या तोंडाची काही हातोडीसारखी तर काही करवतीसारखी लांब हाडं तलवारीसारखी उभी टेवलेली होती.

तिथल्या सारखे शंख शिंपले माशाची सुकवलेली तोंड शेपट्या कवचं बाजूच्या काही घरांमधूनही होती. ती सागरी संपत्ती, तिथल्या होड्या, नांगर बघून वाटलं ही माणसं कोळी किंवा भंडारी समाजाची असावी. गजाबाय म्हणाली आम्ही मुळचे चव्हाण. मराठी आहोत. इथं आडनाव लावत नाय, पतीचं नाव आंबोजी. तो उसाच्या शेतात काम करतो. त्याचा पैसा त्यालाच (दारूला) लागतो. घर मी चालवतो. पोरं आता मोठी झाली. शिकली ती मला धंद्याला हात देतात. शंख शिंपल्याकडे बोट दाखवून गजाबाय म्हणाली. हे समद आमी पान्यात जाऊन जमवून आनायचा. आता आमाला नाय गावत. लय आत दर्यात जावं लागतं. म्हणून आत जाऊन आनणाऱ्याकडन विकत घेतो. साफसूफ करतो. तासतो. रंग लावतो. लय मेहनत आसते. पैसा चांगला मिळतो.

आपल्या मेहनतीबद्दल अभिमानानं सांगत गजाबाय आम्हाला पाठच्या दारी घेऊन गेली. पाठीमागे अथांग समुद्र पसरला होता नी लाटा चंदेरी वाळूतून खळाखळ गजाबायच्या घरापर्यंत झुळझुळत होत्या.

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

त्यावर तांबुस पिवळ्या मावळत्या रंगछटा घेऊन आकाश ओथंबलं होत नी पुर्वेकडे तितक्याच उत्कटतेनं एका निळ्या सावळ्या ढगाआडून इंद्रधनुष्याचा हळूवार गोफ उमटला होता.

ते सारं पहाताना बालकवींच्या इंद्रधनुच्या दुहेरी गोफाची आठवण होत होती. मॉरिशसच्या मंगल गीतातील

विविध रंग हे जमिनीचे नंदनवन हे अवनीचे
स्वप्न रगले सत्यात इद्रधनुची वरती कमान
देश आमचा स्वर्गसमान

या वर्णनाची प्रचिती येत होती. त्या स्वप्नमय दृश्यात आम्ही रंगलो असतानाच गजाबाय म्हणाली, इथं परदेशी लोक मॉप येतात त्यांच्यासाठी लोक हॉटेल बांधतात लय पैसा मिळतो. 'चार-चार पाच-पाच वर्षात लोकांनी झोपडी मोडून बंगले बांधले माजा पयला काय नव्हता. आता मी नवा घर बांधला. आता मी आनकी वर मजला उठवलाय. तिथं मी हॉटेल करीन... चला दावतो असं म्हणून गजाबाय वळली तेव्हा तिच्या चेहऱ्यावरही एक सुंदर इंद्रधनुष्य उमटलं होतं'

**प्रश्न १ ला : उताऱ्याच्या आधारे खालील विधाने पुर्ण करा. (गुण १०)**

१) रत्नागिरीतल्या ........ राजीवाड्याची आठवण होत होती.
२) शंखशिंपल्याची ती सागरी श्रीमंती.........
३) त्यातच अधूनमधून ठेवलेली काटेरी कोरल्स...... अगदी वेड लावत होती.
४) सुरुवातीला ---------- मेहनत असते. पैसा चांगला मिळतो.
५) हे सारं पाहताना--------- दुहेरी गोफाची आठवण होत होती.

**प्रश्न २ रा : उताऱ्याच्या आधारे विधान चूक की बरोबर ते लिहा. (गुण १०)**

१) तिथली घरं समुद्राच्या अगदी कुशीत शिरुन हारीन निवांत पडलेली होती.
२) गेलेलं गळ्यातलं मंगळसूत्र पदरावर काढत गजाबाय बोलत होती. ती कसल्याचं उत्सुकतेन आणि आपुलकीनं आमची विचारपूस करत नव्हती.
३) गजाबायच्या दुकानात काचेची मोठमोठी कपाटे रिकामी होती.
४) शंख शिंपल्यांकडे बोट दाखवून गजाबाय म्हणाली, हे समद आमी पाण्यात जाऊन जमवून आणायचा. आता आम्हाला नाय गावंत.
५) पाठिमागे अथांग समुद्र पसरला होता नी लाटा चंदेरी वाळुतून गजाबाईच्या घराला नेस्तनाभूत करत होत्या.

**प्रश्न ३ रा. गटात न बसणारा शब्द ओळखा. (गुण १०)**

१) सागर, समुद्र, दर्या, नाला
२) चक्री शंख, कळी शंख, जांबुळ शंख, हातोडा शंख
३) पळस गोकर्णी, जाळी, बोगण

www.prepp.in

४) शार्क, सुरमई, पापलेट, ऑक्टोपस
५) निरुती, अवनी, धरती, वसुंधरा, पृथ्वी

**प्रश्न ४. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. (गुण १०)**

१) अथांग
२) प्रचिती
३) समुद्र
४) भंडार
५) मालमत्ता

**प्रश्न ५ वा. खालील शब्दांचे विरोधार्थी शब्द लिहा. (गुण १०)**

१) श्रीमंती
२) अवजड
३) उंच
४) उत्सुक
५) पांढरा

**प्रश्न ६ : खालील शब्दांचे अनेक वचन लिहा. (गुण १०)**

१) साहित्य
२) शंख
३) मासा
४) फुल
५) शिंपला

**प्रश्न ७ वा. खालील वाक्यप्रचारांचा वाक्यात उपयोग करा. (गुण १०)**

१) कुशीत शिरणे
२) शंख करणे
३) प्रचिती येणे
४) इंद्रधनुष्य उमटणे
५) वेड लावणे

प्रश्न ८ वा : पुढील उतारा मराठीत भाषांतरित करा.

Student of women in early Indian history have tended to focus on what is brodly termed as the 'status of women', which is turn has led to a concentration of attention on a limited set of question such as marriage low, property rights, and rights relation to religious practices, normally viewed as indices of status.

www.prepp.in

**प्रश्न ९ वा खालील संख्या अक्षरात लिहा. (गुण १०)**

१) २९३७८६
२) ३९ X ५५ = २१४५
३) ६९३ - २५८ = ४३५
४) ७०३ + १६३ = ८६६
५) ६२५ ÷ १२५ = ५

**प्रश्न १० वा. खालील वाक्ये शुद्ध करुन लिहा. (गुण १०)**

१) मि गावाला जावून येतो.
२) काल सीनेमा लागला.
३) नीयमीत अभ्यास ते करतो.
४) बॅक बद नाहि.
५) खालि जपून उतारा.

---